महाराष्ट्र शासन
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४/२५६५७१७६ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in


**महत्वाचे /तात्काळ**

जा. क्र. :तंशिविकापु/शै.वि.५/संकीर्ण /२०२४-२५/ 4614
दिनांक : 25 NOV 2024

## परिपत्रक

प्रति,
प्राचार्य,
या कार्यालयाचे अधिनस्त सर्व संस्था

**विषय :** भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षात दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ रोजी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करणेबाबत...

**संदर्भ :** उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन परिपत्रक क्र,संकीर्ण/११२४/प्र.क्र.७२/समन्वय/ दि. २२ नोव्हेंबर २०२४

उपरोक्त विषयांस अनुसरून संदर्भीय परिपत्रकाच्या अनुषंगाने या विभागाच्या अधिनस्त सर्व शासकीय तंत्रशिक्षण संस्थांच्या संस्था प्रमुखांना सूचित करण्यांत येते की, या परिपत्रकासोबत जोडलेल्या परिपत्रकाचे अवलोकन करून त्यानुसार कार्यवाही करावी.

दिनांक २६ नोव्हेंबर १९४९ रोजी आपण संविधान स्वीकृत करून दि. २६ जानेवारी,१९५० पासून संविधानाची अंमलबजावणी सुरू झाली. भारतीय संविधानास ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त सन २०२४-२५ या अमृत महोत्सवी वर्षात संविधान अमृत महोत्सव सन २०२४-२५ साजरा करण्याचा निर्णय सामाजीक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दि. १० ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयान्वये घेण्यांत आला आहे.

भारताच्या संविधानाचे तत्वज्ञान,मूल्य,आदर्श व संविधान निर्मितीचा उद्देश स्पष्ट करण्याकरिता संविधान प्रास्तविक/ उद्देशिकेते अनन्यसाधारण महत्व आहे. यास्तव भारतीय राज्यघटनेबाबत जागरूकता तसेच घटनात्मक अधिकार व कर्तव्याबाबत विद्यार्थी व नागरिकांमध्ये जागरूकता वाढविण्यासाठी भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षात दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ रोजी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्याचे आयोजन करण्यांत यावे.

१. उच्च व तंत्रशिक्षण विभागाअंतर्गत सर्व विद्यापीठे,अभिमत विद्यापीठे,स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे, सलंग्नित महाविद्यालये,तत्सम संस्थामध्ये सर्व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ११.०० वा भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्याबाबत आयोजन करण्यांत यावे.
२. शासकीय ग्रंथालयातील जिल्हा ग्रंथालय अधिकारी/ग्रंथपाल व सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये अध्यक्ष/सचिव यांच्या उपस्थितीत वाचक/सभासदांसह भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वरील वेळेत वाचन करावे.
३.सदर उपक्रमाची अंमलबजावणी प्रभावीपणे होईल याबाबत सर्व विद्यापीठे,संचालक,उच्च शिक्षण/तंत्रशिक्षण/ कला/ग्रंथालय यांनी दक्षता घ्यावी.

संविधानाच्या अमृत महोत्सव सन २०२४-२५ अंतर्गत आयोजित करण्यांत येणा-या अन्य उपक्रमाबाबत स्वतंत्रपणे कळविण्यांत येईल.

सोबत : वरील प्रमाणे

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पूणे

प्रत - १. प्रोग्रॅमर तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

E:\जाधव म.भा\M.B.Jadhav letter\परिपत्रक २०२४.docx

भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षात दिनांक २६ नोव्हेंबर, २०२४ रोजी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण ११२४/प्र.क्र.७२/समन्वय
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - २२ नोव्हेंबर, २०२४

वाचा :- सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र. बीसीएच-२० प्र.क्र.२४२५९२/ शिक्षण, दिनांक १० ऑक्टोंबर, २०२४

परिपत्रक

दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी आपण संविधान स्वीकृत करुन दिनांक २६ जानेवारी, १९५० पासून संविधानाची अंमलबजावणी सुरु झाली. भारतीय संविधानास ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त सन २०२४-२५ या अमृत महोत्सवी वर्षात संविधान अमृत महोत्सव सन २०२४-२५ साजरा करण्याबाबतचा निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक १० ऑक्टोबर, २०२४ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

भारताच्या संविधानाचे तत्वज्ञान, मूल्य, आदर्श व संविधान निर्मितीचा उद्देश स्पष्ट करण्याकरिता संविधान प्रास्ताविक/उद्देशिकेचे अनन्यसाधारण महत्व आहे. यास्तव भारतीय राज्यघटनेबाबत जागरुकता तसेच घटनात्मक अधिकार व कर्तव्याबाबत विद्यार्थी व नागरिकांमध्ये जागरुकता वाढविण्यासाठी भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षात दिनांक २६ नोव्हेंबर, २०२४ रोजी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्याचे आयोजन करण्यात यावे.

१) उच्च व तंत्र शिक्षण विभागाअंतर्गत सर्व विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे, संलग्नित महाविद्यालये, तत्सम शैक्षणिक संस्थामध्ये, सर्व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत दिनांक २६ नाव्हेंबर, २०२४ रोजी सकाळी ११.०० वा. भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्याबाबत आयोजन करण्यात यावे.

या उपक्रमाबाबत सर्व विद्यापीठांनी संलग्नित महाविद्यालयांना आवश्यक सूचना द्याव्यात.

२) शासकीय ग्रंथालयातील जिल्हा ग्रंथालय अधिकारी/ग्रंथपाल व सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये अध्यक्ष/सचिव यांच्या उपस्थितीत वाचक/सभासदांसह भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वरील वेळेत वाचन करावे.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
22 NOV 2024
आवक क्र. 9131

३) सदर उपक्रमाची अंमलबजावणी प्रभावीपणे होईल याबाबत सर्व विद्यापीठे, संचालक, उच्च शिक्षण/ तंत्र शिक्षण/ कला / ग्रंथालय यांनी आवश्यक दक्षता घ्यावी.

संविधान अमृत महोत्सव सन २०२४-२५ अंतर्गत आयोजित करण्यात येणाऱ्या अन्य उपक्रमांबाबत स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(अ. शा. मुत्याल)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत -

१. मा.राज्यपाल तथा कुलपती यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
४. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
५. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे
६. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई
७. संचालक, कला संचालनालय, मुंबई
८. संचालक, ग्रंथालय संचालनालय, मुंबई
९. कुलसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिनस्त सर्व विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे.
१०. उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिनस्त विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालये (उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिनस्त विद्यापीठांचे कुलसचिव यांच्यामार्फत)
११. सर्व सह सचिव/ उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. राज्य संपर्क अधिकारी, रासेयो कक्ष, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई
१३. निवड नस्ती